**Bachelor of Arts (B.A.) Part—II Examination**

**MARATHI (New & Old)**

**(Optional)**

**(Literature)**

**(Old Course)**

वेळ : तीन तास] [एकूण गुण: — 100

सूचना :—**सर्व** प्रश्न सोडवा.

1. ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायाच्या आधारे भक्तियोगाचे विवेचन करा. 20

**किंवा**

ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायाची वाङ्मयीन वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

2. कुसुमाग्रजांच्या सामाजिक कवितेचे स्वरूप साधार स्पष्ट करा. 20

**किंवा**

'पृथ्वीचे प्रेमगीत' या कवितेचे रसग्रहण करा.

3. खालीलपैकी कोणत्याही **एका** विभागातील पद्यांशांचा संदर्भासह अर्थ स्पष्ट करा :— 20

**विभाग 'अ'**

(अ) मऱ्हाटियेचां नगरीं ब्रह्मविद्येचा सुकालु करीं।।
घेणें देणें सुखाचे वेऱ्हीं। जगा हों देईं।।
तूं आपलोनि स्नेह पल्लवें। भातें पांगुरवीसि सदैवें।।
तरी आतांचि हें आधवें। निर्मीन मी।।

(ब) उत्तमातें धरिजे। अधमातें अव्हेरिजे।।
हें कहिं चि नेणिजे। वसुधा जेवि।।
रायाचें देह चालूं। रंकातें परडतें गालूं।।
हें नेणें चि कृपाळू। प्राणु पैं गा ।।

(क) समिधाच सख्या या, त्यात कसा ओलावा,
कोठून फुलापरि वा मकरंद मिळवावा
जात्याचं रूक्ष या एकच त्या आकांक्षा
तव अंतर अग्नी क्षणभर तरी फुलवावा.

(ड) तुझ्या कृपा कटाक्षाने
झालो वणव्याचा धनी
त्याच्या निखाऱ्यात कधी
तुला जाळणार नाही.

**किंवा**

**विभाग 'ब'**

(च) घरिचिया उजियेड करावा। पारखेया आंधारू होआवा।।
हें न ह्मणे चि पांडवा। दीपु जैसा।।
ऐसी सर्वभूतमात्रीं। येकपणाची मैत्री।।
कृपेची धात्री। आपण जो।।

(छ) परि टाकिलेयांहिं सागरू। जैसा मागील यावा अनिवारू।।
तिये गंगेचिया ऐसा पडिभरू। प्रेमभावां।।
वरूषाकालिं सरिता। जैसी चढों लागे. पांडुसुता।।
तैसी दूणे वरि भजतां। श्रद्धा दीसे।।

(ज) खालून आग, वर आग, आग बाजूंनी
समशेर उसकली सहस्र क्रूर इमानी,
गर्दीत लोपले सात जीव ते मानी
खग सात जळाले अभिमानी वणव्यात
वेडात मराठे वीर दौडले सात.

(झ) स्मित करून म्हणाल्या मला चांदण्या काही,
तो मुक्त प्रवासी फिरत सदोदित राही
उठतात तमावर त्याची पाऊल चिन्हे
त्यांनाच पुससि तू, आहे की तो नाही.

4. खालीलपैकी कोणत्याही **एका** विभागातील प्रश्नांची उत्तरे लिहा :— 20

**विभाग 'क'**

(त) वाङ्मयीन अभिरूची म्हणजे काय ? स्पष्ट करा ?

(थ) साहित्याचे प्रमुख प्रकार सांगून कादंबरी या प्रकाराविषयी माहिती द्या.

(द) आस्वादाला आवश्यक असणारे गुण कोणते ?

(ध) साहित्य प्रकाराच्या संदर्भातील अर्थबोधाचा सिद्धांत वर्णन करा.

**किंवा**

**विभाग 'ख'**

(प) 'साहित्याची बांधिलकी' संकल्पना स्पष्ट करा.

(फ) 'संभावनाविरह' या आस्वादातील अडथळयाचे स्वरूप स्पष्ट करा.

(ब) सांस्कृतिक पर्यावरण आणि अभिरूची यातील संबंध स्पष्ट करा.

(भ) संशययोग म्हणजे काय ?

5. खालील सर्व प्रश्नांची उत्तरे लिहा :— 20

(1) ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायातील गुरूगौरवाये वर्णन करा.

(2) ज्ञानेश्वरांनी अभ्यासाचा महिमा कसा वर्णन केला आहे.

(3) 'जालीयनवाला बाग' या कवितेचे आशयसूत्र स्पष्ट करा.

(4) 'विराट वड' या कवितेची मध्यवर्ती कल्पना स्पष्ट करा.

(5) साहित्य आणि समाज यांच्यातील परस्पर संबंध स्पष्ट करा.

**Bachelor of Arts (B.A.) Part—II Examination**

**MARATHI (New & Old)**

**(Optional)**

**(Literature)**

**(New Course)**

वेळ : तीन तास] [एकूण गुण: — 100

सूचना :—**सर्व** प्रश्न सोडवा.

1. 'कविता' या वाङ्मयप्रकाराची संकल्पना व स्वरूप विशद करा. 10

**किंवा**

'जपून रे, माझ्या फिनिक्स पक्ष्यानो' या कवितेचे रसग्रहण करा.

2. आधुनिक मराठी कथेची प्रमुख वैशिष्ट्ये सांगा. 10

**किंवा**

'जाब' या कथेतून न्याय-अन्याय व विषमतेचे दर्शन कसे घडते ? ते सांगा.

3. खालीलपैकी कोणत्याही **एकाच** गटातील संदर्भासहित अर्थ स्पष्ट करा :— 20

**गट 'अ'**

(क) "अनंता, ट्रेनिंग कसोशीनं घे, अव्वल नंबरात
आत्लं पाहिजे तुझा बाप पोलिस इन्स्पेक्टर आहे, ध्यान्यात ठेव."

(ख) "नुस्तंबधून हसायला काय माकडं समजलास
व्हय गा SS आमाला ?"

(ग) स्मृतातून बाहेर पडून
जगण्याचा भाग होतो
भाषेतून बाहेर पडून
कवितेचा गाभा होतो.

(घ) मला मान्य नाही तुमची दया
जिच्यावर दिशा डोलतात
मला मान्य नाही माझे श्वास
जे तुमच्या बलावर चालतात.

**किंवा**

**गट 'आ'**

(च) काकरात बिजवाई जसं हासरं चांदनं
धरतीच्या अंगोपांगी लाळानौसाचं गोदनं
सरीवर सरी येती माती न्हातीधुती होते
तिच्या कस्तुरीचा वास मूल जीवाले पाळते.

(छ) अशा कशा ज्याने त्याने
गाडल्या उमेदी ?
असा कसा ते त्ते येथे
होत से खरेदी ?
ह्या अपार दु:खांचीही चालली दलाली !

(ज) ''तुम्ही एवढं माझ्या जीवाला व्हा ! मला संकटातनं
वर काढा. जलम भर मी तुमाला इसरणार न्हाई बगा।''

(झ) ''नाना, मी लेकराच्यानं खरं सांगतूय! तसं तुमचं म्हणण असलं तर मी या आपल्या पाटंला देखत पोराच्या टाळूवर हात मारतू''

4. खालीलपैकी कोणत्याही **एकाच** गटातील प्रश्नांची उत्तरे लिहा :— 20

**गट 'क'**

(त) 'सांगाती' या कवितेत कवी अनील परमेश्वराला कोणती विनंती करतात ?

(थ) अनंताच्या आईची व्यक्तिरेखा थोडक्यात लिहा.

(द) 'कल्पनाशक्ती' या संज्ञेचा अर्थ स्पष्ट करा.

(ध) स्त्रीवादी संघटनेच्या कार्याचा परिचय करून द्या.

**किंवा**

**गट 'ड'**

(प) मला लिहिताच आले नाही निसर्गाचे शोकगीत अद्याप' असे अजीम नवाज राही का म्हणतात ?

(फ) मौनी बाबाची वर्तमानपत्रातील बातमी वाचून शरदची अवस्था कशी झाली ?

(ब) हेगेलची महाकाव्याच्या संदर्भातील भूमिका विशद करा.

(भ) कवयित्री नीरजांच्या कवितेतील आशय स्पष्ट करा.

5. खालील **सर्व** प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा :— 20

(1) 'झाड तोडण्याऐवजी सरळ झाडच वाचावे, असे कवी डहाके का म्हणतात ?

(2) आबाने टमाट्याचा ढीग का तुडविला ?

(3) 'साहित्यकृतीचा अनुभव म्हणजे दुसरी निर्मितीच असते, स्पष्ट करा.

(4) गौरी देशपांडे यांच्या कादंबरी लेखनाची वैशिष्ट्ये सांगा.

6. खालील सर्व प्रश्नांची योग्य पर्यायी उत्तरे लिहा :— 20

(1) 'माझी आई' या कवितेचे कवी ——— आहेत.

(अ) यशवंत मनोहर (ब) नारायण सुर्वे

(क) भुजंग मेश्राम (ड) अनिल

(2) नवकाव्याचे प्रभावी आविष्करण —— यांच्या कवितेतून प्रकट झाले.

(अ) केशव सुत (ब) मर्ढेकर

(क) करंदीकर (ड) ग्रेस

(3) चंद्रपूर येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ——— होते.

(अ) वसंत आबाजी डहाके (ब) अरूण साधू

(क) मारोती चित्तमपल्ली (ड) सुभाष भेंडे

(4) 'भीमवंदना' या कवितेचे कवी ——— हे होय.

(अ) अनिल (ब) नारायण सुर्वे

(क) सुरेश भट (ड) यापैकी नाही

(5) ''वाट बघणाऱ्या फांद्या'' या कवितेचे कवी कोण ?

(अ) अनुराधा पाटील (ब) अजीम नवाज राही

(क) प्रफुल्ल सिलेदार (ड) विठ्ठल वाघ

(6) 'लाल चिखल, या कथेचे कथाकार कोण ?

(अ) शंकर पाटील (ब) शंकर राव खरात

(क) श्री. दा. पानवलकर (ड) भास्कर चंदनशिव

(7) 'नवस' ही कथा ——— यांनी लिहिली.

(अ) राजन गवस (ब) भास्कर चंदनशिव

(क) शकर पाटील (ड) शंकरराव खरात

(8) रत्ना मावशी हे पात्र ——— या कथेतील आहे.

(अ) वेणा (ब) जाब

(क) माणसाची गोष्ट (ड) मारवा

(9) मुंबईला परतल्यावर महिनाभर शरद ——— फिरकला नाही.

(अ) वेधशाळेकडे (ब) आश्रमशाळेकडे

(क) प्रयोगशाळेकडे (ड) यापैकी नाही.

(10) शेतकरी कुटुंबाच्या व्यथा वेदनेचे चित्र ——— या कथेत आले आहे.

(अ) खुदा हाफिज (ब) नवस

(क) जाब (ड) लाल चिखल

(11) कोलरिजने ——— ही आणखी एक शक्ती मानली आहे.

(अ) प्रतिभा (ब) कल्पना

(क) चमत्कृती (ड) यापैकी नाही

(12) साहित्य प्रकारासंबंधीची आधुनिक भूमिका ही प्रामुख्याने ——— स्वरूपाची आहे.

(अ) वर्णनात्मक (ब) विश्लेषणात्मक

(क) समीक्षणात्मक (ड) कथात्मक

(13) ॲरिस्टॉटल्यच्या मते मुख्यत्वे अनुकृतीच्या माध्यमावरून ——— या भिन्न ठरतात.

(अ) कविता (ब) कला

(क) संकेत (ड) प्रतिभा

(14) 'प्रतिभा' ही काव्यार्थाला अलौकिक शक्ती ——— यांनी मानली.

(अ) अभिनवगुप्त (ब) राजशेखर

(क) मम्मट (ड) वामन

(15) भामहाच्या मते काव्याचे ——— प्रकार आहेत.

(अ) तीन (ब) दोन

(क) चार (ड) पाच

(16) ——— हे वर्ष युनोने स्त्री दशक म्हणून जाहीर केले.

(अ) 1977 (ब) 1980

(क) 1974 (ड) 1975

(17) स्त्रीवादी चळवळ ही ——— चळवळ आहे.

(अ) जीवन मुक्तीची (ब) स्त्रीमुक्तीची

(क) मानवमुक्तीची (ड) राष्ट्रमुक्तीची

(18) 'वाळूचा प्रियकर' हा काव्य संग्रह कोणाचा आहे.

(अ) गोविंदाग्रज (ब) मल्लिका अमरशेख

(क) मर्ढेकर (ड) अनिल

(19) 'हंस अकेला' हा कथासंग्रह ——— यांचा आहे.

(अ) उर्मिला पवार (ब) मेघना पेठे

(क) प्रज्ञा पवार (ड) कुमुद पावडे

(20) भारतीय महिला फेडरेशनची स्थापना ——— या वर्षीझाली.

(अ) 1953 (ब) 1954

(क) 1955 (ड) 1980